Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.

**परिपत्रक**

क्र एबाविसेयो/का- २ / ४३६२ /२०१०
आयुक्तालय,एकात्मिक बाल विकास सेवा योजना
रायगड भवन,१ ला मजला (रियर विंग),
सी.बी.डी, बेलापूर,नवी मुंबई-४०० ६१४.
दिनांक : - १० / ८ / २०१०

प्रति,
सदस्य सचिव,
जिल्हास्तरीय सकस आहार समिती तथा
बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी )---------------

विषय - एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत नागरी प्रकल्पातील अंगणवाडयांना पुरक पोषण आहार पुरवठा करण्यासाठी नव्याने महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगटांची नियुक्ती करणेबाबत ..

संदर्भ - १. शासन निर्णय क्रमांक महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग एबावि २००१/ प्रक्र २७९/ का ५ दिनांक ३०.१२.२०००
२. शासन निर्णय क्रमांक महिला व बाल विकास विभाग एबावि २००४/ प्रक्र २३३/ का ५ दिनांक २८/१०/२००५
३.शा नि क्र एबावि २००८/प्रक्र५९/ का ५/ मुंबई दिनांक २४/८/२००९

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत केंद्रशासनाने प्रति दिन प्रति लाभार्थी सुधारित प्रमाण व सुधारित निकषात सुधारणा केल्यानुसार उपरोक्त शासन निर्णय क्र. ३ अन्वये सुधारित प्रमाणकानुसार प्रति दिन प्रति लाभार्थी सुधारित दरास मंजूरी प्राप्त झालेली होती. सदर शासन निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी व्हावी या उद्देशाने आयुक्तालयाचे पत्र क्र. ३२०१ दि. ३०/९/२००९ अन्वये पुढील १ वर्षाकरिता जुन्या महिला मंडळे/ संस्था / बचत गटांमार्फत आहार पुरवठा सुरु ठेवणेबाबत कळविण्यात आलेले आहे. सदर बाबीस माहे सप्टेंबर-२०१० अखेर १ वर्षे पुर्ण होत असल्याने दि. २८/१०/२००५ व दि. २४/८/२००९ च्या शासन निर्णयान्वये नव्याने निवड प्रक्रिया करणे आवश्यक आहे.

संदर्भीय क्रमांक ३ च्या शासन निर्णयानुसार शासनाने खालील प्रमाणे आहाराचे प्रमाण व सुधारीत दरास मान्यता दिलेली आहे.

| अक्र | लाभार्थी प्रकार | आहाराचे प्रमाण व स्वरुप | प्रती दिन प्रती लाभार्थी आहार दर | पुरक पोषण आहाराचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| १ | ३ ते ६ वर्ष पर्यंतची सर्व बालके | ५०० उष्मांक आणि १२ ते १५ ग्रॅम प्रथिने | रु ३.९२ | १. सकाळचा नास्ता<br>२. गरम ताजा आहार<br>(अंगणवाडीत खाऊ घालणे ) |

महिला मंडळ बचत गटांची नियुक्ती संदर्भीय शासन निर्णय क्र १, २ व ३ नुसार करण्यात यावी. याशिवाय निवड प्रक्रीया अधिक सुलभ व्हावी यासाठी सोबत सविस्तर मार्गदर्शनपर सुचना **(प्रपत्र अ )** निर्गमीत करण्यात येत आहेत.

जिल्हास्तरीय समितीच्या मान्यतेने पाककृती निश्चित करुन, स्थानिक वृत्तपत्रातून जाहिरातीद्वारे समितीच्या सदस्य सचिवांनी प्रकल्प निहाय अर्जाची मागणी करावी. सोबत जाहिरातीचे प्रारुप व अर्जाचा नमुना **(प्रपत्र ब )** व **(प्रपत्र क)** हया सोबत जोडण्यात येत आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.

जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली असलेल्या जिल्हा स्तरीय समितीमार्फत **दि. ३० सप्टेंबर,२०१० पुर्वी बचत गट / महिला मंडळे यांची निवड प्रक्रिया पूर्ण करुन दि. १ ऑक्टोंबर, २०१० पासून बचत गट / महिला मंडळे/ महिला संस्था यांच्यामार्फत पूरक पोषण आहाराचा पुरवठा सुरु करणेबाबत कार्यवाही करण्यात यावी.**

ज्या जिल्हयामध्ये एकापेक्षा जास्त प्रकल्प कार्यान्वित असतील अशा प्रकल्पांमध्ये शासन निर्णय क्र. एबावि-२०००/प्रक्र२७९/का-५ दि. ३०/१२/२००० अन्वये जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा स्तरीय समितीमार्फत सदर प्रक्रिया पूर्ण करावयाची आहे. तसेच **आयुक्तालयामार्फत नियुक्त केलेल्या नोडल ऑफीसर यांनी समितीचे सदस्य सचिव म्हणून काम पहावे व जिल्हयातील सर्व नागरी प्रकल्पांची निवड प्रक्रिया पुर्ण करावयाची आहे.** (सोबत यादी जोडलेली आहे ) तसेच जाहिरातीद्वारे प्राप्त अर्जाची प्रकल्प निहाय छाननी करावी. सदरची छाननी करण्यासाठी सदस्य सचिवांना उर्वरित संबंधीत प्रकल्प अधिका-यांनी संपूर्ण सहकार्य करावे व आपआपल्या प्रकल्पातील किचन भेटीचे अहवाल तसेच अर्जाचे पात्र /अपात्र बाबतचे सविस्तर विवरणपत्र सदस्य सचिवांना तयार करुन दयावे. छाननी चे काम पूर्ण झाल्यानंतर जिल्हास्तरीय समितीच्या मान्यतेने पात्र अर्जदार महिला मंडळ, महिला संस्था, बचत गट यांना आहार वाटपाचे काम समप्रमाणात वाटप करण्यात यावे.

ज्या प्रकल्पाचे अंगणवाडी केंद्राची संख्या एका पेक्षा जास्त जिल्हयात विखुरलेल्या असतील तर अशा परिस्थितीत ज्या जिल्हयामध्ये जास्तीत जास्त अंगणवाडी केंद्र असतील त्यासंबंधित जिल्हाचे जिल्हास्तरीय सकस आहार समितीने आहारपुरवठा करणाऱ्या महिला मंडळ / महिला बचत गट / महिला संस्था यांची निवड प्रक्रिया करावी.

सदर परिपत्रक या कार्यालयाच्या वेबसाईट क्र www.icds.gov.in वर प्रसिध्द करण्यात आलेले आहेत.

सोबतः- नोडल ऑफीसरची यादी,

आयुक्त
एकात्मिक बाल विकास सेवा योजना
महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई.

१. मा सचिव , महिला व बाल विकास विभाग मंत्रालय मुंबई
२. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा स्तरीय सकस आहार समिती सर्व जिल्हे-------------------

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.

## प्रपत्र अ

## अंगणवाडी केंद्रांना (नागरी) महिला मंडळ/ महिला बचतगट यांचे मार्फत आहार पुरवठा चे काम मंजूर करण्या संदर्भात अटी व शर्ती -

१. महिला मंडळ म्हणजे महिला संस्था असून सदर संस्थेचे सर्व संचालक/ विश्वस्त/ सदस्य हे महिला असणे आवश्यक असून तिची सार्वजनिक विश्वस्त कायदा-१९५०, संस्था नोंदणी अधिनियम-१८६०, महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम-१९६० किंवा कंपनी अधिनियम- १९५६ यापैकी कोणत्याही अधिनियमाखाली नोंदणी झालेली असावी. नोंदणी प्रमाणपत्र-घटना (Bye laws) व सभासद यादी तसेच बचतगटांचे बाबतीत स्वर्ण जयंती शहरी रोजगार योजना, उपनिबंधक सहकारी सोसायटी, महिला आर्थिक विकास महामंडळ यांनी नोंदणी केलेले नोंदणीबाबतचे पत्र / प्रमाणपत्र, बचतगटातील सदस्यांची यादी जोडणे आवश्यक राहील.

२. आहार पुरवठा करीत असलेले बचतगटांचे बँकेत खाते असलेले पासबुक, बचतगटातील सदस्यांची यादी, गटाचे वेळोवेळी होणाऱ्या बैठकीची उपस्थिती व इतिवृत्त नोंद वहीतील इतिवृत्त इत्यादि कागदपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

३. अर्ज करणा-या महिला मंडळांचे स्वतंत्र किचन असणे आवश्यक आहे तेथे स्वच्छता, पाणीपुरवठा, हवेशीर वातावरण, आवश्यक भांडी, गॅस कनेक्शन इत्यादी असणे आवश्यक आहे. अर्ज केलेल्या सर्व महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगट यांचा ज्या ठिकाणी आहार शिजवीला जाणार आहे त्या ठिकाणचा (किचनचा) तपासणी अहवाल संबंधीत प्रकल्प अधिकाऱ्यांमार्फत मागविण्यात येईल. किचनची जागा आरोग्यदृष्टया अयोग्य असल्याचा अहवाल प्रकल्प अधिका-याकडून प्राप्त झाल्यास काम मंजूर करण्यात येणार नाही.

४. अर्जदार महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगट स्थानिक असावेत. स्थानिक म्हणजे महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगटाच्या नोंदणीचा पत्ता व किचनचा पत्ता ज्या प्रकल्प क्षेत्रात असेल त्या महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगटासाठी तो प्रकल्प विभाग म्हणजे स्थानिक असेल.

५. अर्जदार महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगट यांचेकडे अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत किमान दोन (२ ) वर्ष पूर्ण कालावधीचा शासकीय योजनेत शिजविलेला आहार पुरवठा करण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे. व त्याबाबत सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

६. काही नागरी प्रकल्प हे दोन ते तीन नगरपालिका क्षेत्रात विभागलेले आहेत त्या प्रकल्पामधील ज्या नगरपालिका क्षेत्रातील पत्यावर महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगटाची नोंदणी, किचनचा पत्ता असेल त्याच नगरपालिका क्षेत्रातील एकूण अंगणवाडया सदर महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगटांना समप्रमाणात वाटप करण्यात येईल.

७. प्रकल्पनिहाय महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगटांचे अर्जासोबत सादर केलेल्या मूळ कागदपत्रांची तपासणी संबंधीत प्रकल्प अधिकाऱ्यांकडून करण्यात येऊन प्रमाणित करण्यात येईल.

८. महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगट यांचे मधील कार्यकारी मंडळ/सदस्य या पैकी जी महिला देयक सादर करणे व त्यावर स्वाक्षरी करणे, धनादेश स्विकारणे व त्याची स्वाक्षरीसह पोहोच देणे याबाबत प्राधिकृत असेल याबाबतचा ठराव अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

९. आहार पुरवठा केलेल्या कालावधीत अनियमित पुरवठा करणे, खंडीत पुरवठा करणे बाबत सदर महिला मंडळ/बचतगटास कारणे दाखवा नोटीस किमान तीनवेळा दिले असल्यास त्या मंडळास/बचतगटास काम देण्यात येणार नाही. याबाबतीत अर्जदाराने अर्जासोबत ज्या शासकीय योजनेत आहार पुरवठा करीत होते त्या संबंधित सक्षम अधिकाऱ्याकडून काम समाधानकारक असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

१०. जिल्हास्तरीय समितीने प्रकल्पनिहाय पात्र ठरविलेल्या अर्जदार महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगटांना आहार पुरवठयासाठी समप्रमाणात अंगणवाडयाचे वाटप करण्यात येईल.

११. अर्जदार महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगट यांना ३ महिने आहार पुरवठा करण्याची क्षमता असावी. अर्ज सादर करतेवेळी नगरपालिका क्षेत्रात रु. २५०००/- (पंचवीस हजार ) व महानगरपालिका क्षेत्रात

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.

रु.५०,०००/- बॅक बॅलेन्स असणे आवश्यक आहे. अर्जा सोबत बॅकेचे बॅक बॅलन्स प्रमाणपत्र जोडाणे आवश्यक राहील.

**१२. ३ ते ६ वर्ष वयोगटातील मुलांसाठी आहार प्रमाण व दर खालील प्रमाणे राहतील.**

| अक्र | लाभार्थी प्रकार | आहाराचे प्रमाण व स्वरुप | प्रती दिन प्रती लाभार्थी आहार दर | पुरक पोषण आहाराचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| १ | ३ ते ६ वर्ष पर्यतची सर्व बालके | ५०० उष्मांक आणि १२ ते १५ ग्रॅम प्रथिने | रु ३.९२ | १. सकाळचा नास्ता<br>२. गरम ताजा आहार<br>(अंगणवाडीत खाऊ घालणे ) |

१३. शासन निर्णय क्रमाक एबावि २००८/प्रक्र५९/का५/ दिनांक २४ ऑगस्ट २००९ मधील परिशिष्ठ दोन मध्ये पाककृती दिलेल्या आहेत. तथापी स्थानिक पातळीवर त्या त्या ठिकाणच्या भौगोलिक परिस्थितीनुसार उपलब्ध असलेले खादय पदार्थ विचारात घेवून त्यात आवश्यक ते फेरबदल करण्याचे अधिकार जिल्हास्तरीय सकस आहार पुरवठा समितीस राहतील.

१४.दंडात्मक कार्यवाही शासन निर्णय क्रमांक एबावि २००८/प्रक्र५९/का५/ दिनांक २४ ऑगस्ट २००९ मधील मुद्दा क्र. ३.१० व ३.११ नुसार करण्यात येईल.

१५.जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेल्या पाककृती प्रमाणे व शासनाने ठरवून दिलेल्या प्रति लाभार्थी प्रति दिन अनुज्ञेय दराने तसेच सुधारित प्रमाणकानुसार आहार पुरवठा करण्यास तयार असून त्याबाबत आम्ही महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगट बांधील आहोत असे हमीपत्र दयावे लागेल. व जिल्हास्तरीय समितीने ठरवून दिलेलया पाककृतीमधील सर्व घटक पोषण आहारामध्ये असणे आवश्यक राहील.

१६. महिला मंडळ/बचतगट /महिला संस्था यांची स्वत:ची वाहतूक व्यवस्था असणे आवश्यक असून अंगणवाडी केंद्रावर वेळेवर आहार पुरवठयाची करण्याची जबाबदारी राहील.

१७. अन्नामध्ये कुठल्याही प्रकारचे भेसळ आढळून आल्यास/जिवितास धोकादायक पदार्थ असल्यास अन्न व औषध भेसळ प्रतिबंधक कायद्यांतर्गत महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगट हे कार्यवाहीस पात्र राहतील.

१८. महिला मंडळ/बचतगट /महिला संस्था यांचे स्वयंपाकगृह आयुक्त व त्यांनी प्राधिकृत केलेले/ अधिपत्याखालील अधिकारी/कर्मचारी भेट देऊन तपासणी करु शकतील.

१९. नव्याने निवड केलेल्या महिला मंडळ/बचतगट /महिला संस्था यांचा पुरवठा कालावधी पुरवठा आदेश दिल्यापासून एक वर्षाचा राहील.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.

# जाहिरात

विषय - एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत नागरी प्रकल्पातील तयार आहार पुरवठयाकरीता महिला मंडळे/ स्वयंसहाय्यता बचत गट /महिला संस्था यांचे कडून अर्ज मागविणेबाबत

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत ----------------- जिल्हयातील नागरी प्रकल्प १.------------ २. ----------- ३. ---------------- हया ----- प्रकल्पामधील अंगणवाडी केंद्रासाठी तयार आहार पुरवठा करण्यासाठी प्रकल्प निहाय अर्ज मागविण्यात येत आहेत.

३ ते ६ वर्ष वयोगटातील मुलांसाठी आहार प्रमाण व दर खालील प्रमाणे राहतील.

| अक्र | लाभार्थी प्रकार | आहाराचे प्रमाण व स्वरुप | प्रती दिन प्रती लाभार्थी आहार दर | पुरक पोषण आहाराचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| १ | ३ ते ६ वर्ष पर्यतची सर्व बालके | ५०० उष्मांक आणि १२ ते १५ ग्रॅम प्रथिने | रु ३.९२ | १. सकाळचा नास्ता<br>२. गरम ताजा आहार<br>(अंगणवाडीत खाऊ घालणे ) |

वरील प्रमाणाचे आहाराबाबत जिल्हास्तरीय समिती जी पाककृती ठरवेल त्याप्रमाणे आहार पुरवठा करावा लागेल. अर्ज करणा-या महिला मंडळ / महिला संस्था / बचत गटांना खालील प्रमाणे अटी व शर्ती लागू राहतील.

१. अर्जदार महिला मंडळ बचत गट स्थानिक असावे. (स्थानिक म्हणजे महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगट नोंदणीचा व किचनचा पत्ता ज्या प्रकल्प विभागात असेल त्या महिला मंडळासाठी तो प्रकल्प विभाग म्हणजे स्थानिक राहिल व त्याच प्रकल्पासाठी अर्ज करता येईल.
२. अर्जदार महिला मंडळ / महिला संस्था नोंदणीकृत असावेत, महिला बचतगटाच्या बाबतीत बँकेचे पासबुक असावे.
३. एका महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगटास एकाच प्रकल्पात अर्ज करता येईल.
४. अर्जदार महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगट यांचेकडे अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत किमान दोन (२ ) वर्ष पूर्ण कालावधीचा शासकीय योजनेत शिजविलेला आहार पुरवठा करण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे. व त्याबाबत सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.
५. जिल्हयातील सर्व किंवा कोणत्याही नागरी प्रकल्पांतर्गत असणा-या अंगणवाडयांना आहार पुरवठा करणे बाबत सादर केलेल्या अर्जावर कोणतेही कारण न देता स्विकारणे अथवा नाकरण्याचे सर्व अधिकार जिल्हास्तरीय समितीकडे राखून ठेवण्यात येत आहेत.
६. आहार पुरवठयाबाबत महिला मंडळे/ स्वयंसहाय्यता बचत गट यांनी सादर करावयाचा अर्जाचा नमुना बाल विकास प्रकल्प अधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हास्तरीय समिती, यांचे कॅम्प ऑफिस बाल विकास प्रकल्प अधिकारी , ------------------येथे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत दिनांक -------------- **ते** -----------या कालावधीत विनामुल्य मिळेल. अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक ------------ राहील. सदर अर्जाचा नमुना आयुक्तालयाच्या वेबसाईट क्र. www.icds.gov.in यावर देखील उपलब्ध आहे.
७. महिला मंडळ / स्वयंसहाय्यता बचत गट यांचे मार्फत तयार पुरक पोषण आहार पुरवठा करण्यासाठी सविस्तर अटी व शर्ती अर्जासोबत देण्यात येतील.

बाल विकास प्रकल्प अधिकारी--------- तथा
जिल्हास्तरीय सकस आहार पुरवठा
--- जिल्हा

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष सदस्य सचिव
जिल्हास्तरीय सकस आहार पुरवठासमिती ----
समिती ---------- जिल्हा

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.

## प्रपत्र ब

## पुरक पोषण आहाराचा पुरवठा करण्यासाठी अर्जाचा नमुना

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदार महिला मंडळ/ बचत गट / महिला संस्थांचे नाव व पत्ता | - |
| २ | ज्या प्रकल्पाकरीता अर्ज करावयाचा आहे त्या प्रकल्प कार्यालयाचे नाव | - |
| ३ | महिला मंडळ / महिला संस्था नोंदणीकृत आहे काय?<br>असल्यास कोणत्या कायदयाने ?<br>नोदणी क्रमांक व दिनांक<br>बचगटाच्या बाबतीत बैंकेचे खाते क्रमांक व खाते उघडल्याचा दिनांक | - |
| ४ | अर्जदार महिला मंडळे/ बचत गट / महिला संस्था यांना आहार पुरवठयाचा अनुभव असल्यास त्याबाबत विस्तृत तपशील | - |
| ५ | कार्यालयाचा पत्ता | - |
| ६ | उत्पादन केंद्राचा / किचनचा पत्ता | - |
| | किचनचे जागेचे क्षेत्रफळ चौरस फुट<br>बांधकाम कच्चे / पक्के | - |
| ७ | महिला मंडळ /महिला संस्था/ बचत गटाचे अध्यक्ष तथा सदस्य सचिव (जे मंडळाचे प्रत्यक्ष कामकाज पाहणार) त्यांचे नाव , पत्ता , दूरध्वनी क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक | - |
| ८ | अर्जदार महिला मंडळ / महिला संस्था /बचतगट यांच्याकडे असणा-या आवश्यक प्रमाणपत्राबाबत सोबत जोडलेल्या परिशिष्ठामध्ये माहिती दयावी. ( प्रपत्रा प्रमाणे कागदपत्रके राजपत्रित अधिकारी तसेच सक्षम अधिकारी यांनी स्वाक्षांकीत केलेल्या सत्यप्रती अर्जासोबत जोडावेत) | |

प्रमाणित करण्यात येते की, अर्जा मध्ये नमुद केलेली सर्व माहिती व जोडलेले सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्रे सत्य असून त्यामध्ये काही खाडाखोड तथा बनावट आढळून आल्यास महिला मंडळाचे पदाधिकारी फौजदारी दंडसंहीतेनुसार कार्यवाहीस पात्र राहील.

अर्जदार महिला मंडळ / बचत गट / महिला संस्था
स्वाक्षरी व नावाचा शिक्का

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.

# प्रपत्र क

महिला मंडळे / बचत गट यांच्याकडे आवश्यक असणा-या प्रमाणपत्राबाबत माहिती सादर करावयाचे विहित प्रपत्र

| अ क्र | महिला मंडळाचे / बचत गटाचे नाव व पूर्ण पत्ता | किचन पत्ता | अन्न व औषध प्रशासन विभाग/ महानगरपालिका / नगरपालिका यांचेकडील किचन नाहरकत प्रमाणपत्राचा क्र. व दिनांक | नोंदणी क्रमांक व दिनांक / बचतगटाच्या बाबतीत बँकेचे खाते क्रमांक व बँकेचे नाव | अर्ज करण्याचे तारखेस उपलब्ध बॅलन्स | अंगणवाडीत आहार पुरवठा/ शालेय पोषण आहार योजनेंतर्गत आहार पुरवठा केल्याबाबतचे अनुभवाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

स्वाक्षरी
अर्जदार महिला मंडळ / बचत गट

टीप :- महिला मंडळाचे नोंदणी प्रमाणपत्र / उपविधीची प्रत, सभासदांची यादी, बचत गटाचे बाबतीत बॅकेच्या पासबूकची व बॅक बॅलन्स प्रमाणपत्राच्या प्रती राजपत्रित / सक्षम अधिका-याकडून स्वाक्षांकीत केलेल्या सोबत जोडव्यात.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतर्गत नागरी प्रकल्पातील अंगणवाडयांना गरम ताजा आहार पुरवठा करणेसाठी महिला मंडळ / महिला संस्था / स्वयंसहाय्यता बचत गट निवडीची प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी खालील अधिकाऱ्यांची त्यांच्या नावासमोर असलेल्या जिल्हयासाठी नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. सदर अधिकाऱ्यांनी महिला मंडळ / महिला संस्था / स्वयंसहाय्यता बचत गट निवडीची प्रक्रिया पुर्ण करावयाची आहे.

| अ.क्र. | बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्याचे नांव | प्रकल्पाचे नांव | निवड प्रक्रियापुर्ण करावयाचा जिल्हा |
|---|---|---|---|
| १ | श्री. जी. व्ही. देवरे | कुलाबा, धारावी, प्रभादेवी, रेड लाईट एरिया, अंधेरी, अंधेरी-२, अंधेरी-३, भांडुप (पुर्व), भांडुप(पश्चिम), बांद्रा (पश्चिम), बोरीवली-१, बोरीवली-२, गोरेगांव (पुर्व), गोरेगांव (पश्चिम), खार (पश्चिम), सांताक्रुझ (पुर्व), खार-सांताक्रुझ, मालवणी, वरळी | मुंबई शहर व मुंबई उपनगर |
| २ | श्रीमती संध्या नगरकर | माहिम, वडाळा-शिवडी,चेंबुर, घाटकोपर, घाटकोपर-२, गोवंडी, जोगेश्वरी, कुर्ला, मानखुर्द, मुलुंड (पुर्व), मुलुंड (पश्चिम), शिवाजीनगर, ट्रॉम्बे, तुंगामोहाली, विक्रोळी - कांजुरमार्ग | मुंबई शहर व मुंबई उपनगर |
| ३ | श्री. विजय जी. क्षीरसागर | ठाणे-१ | ठाणे |
| ४ | श्री. जाधव | रायगड-रत्नागिरी- सिंधुदुर्ग | रायगड-रत्नागिरी- सिंधुदुर्ग |
| ५ | श्री. आर. एस. मोरे | पिपरी चिंचवड | पुणे |
| ६ | श्री. एस. ए. शिंदे | इचलकरंजी | कोल्हापूर |
| ७ | श्री. काटकर | सातारा | सातारा |
| ८ | श्रीम. शिल्पा पाटील | सांगली | सांगली |
| ९ | श्रीम. व्ही. बी. खरात | अक्कलकोट | सोलापूर |
| १० | श्री. मंचरकर | अहमदनगर | अहमदनगर |
| ११ | श्रीम. सुरेखा पाटील | नाशिक | नाशिक |
| १२ | श्री. ए. एच. कुंवर | धुळे | धुळे |
| १३ | श्री. दाभाडे | जळगांव | जळगांव |
| १४ | श्रीम. कमल इंगळे | औरंगाबाद | औरंगाबाद |
| १५ | श्री. शिरसाट | नांदेड | नांदेड |
| १६ | श्री. कांगणे | परभणी | परभणी |
| १७ | श्री. कांगणे | हिंगोली | हिंगोली |
| १८ | श्री. आर. डी. कुलकर्णी | बीड | बीड |
| १९ | श्री. एम. एस. वाघमारे | जालना | जालना |
| २० | श्री. वैभव कुलकर्णी | लातूर-उदगीर | लातूर |
| २१ | श्री. वैभव कुलकर्णी | उस्मानाबाद | उस्मानाबाद |
| २२ | श्रीम. वंदना चौधरी | अमरावती | अमरावती |
| २३ | श्री. राठोड | यवतमाळ | यवतमाळ |
| २४ | श्री. कंकाळ | बुलढाणा-मलकापूर-शेगांव | बुलढाणा |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.

| | | | |
|---|---|---|---|
| २५ | श्रीम. ए. के. इंगोले | अकोला | अकोला |
| २६ | श्रीम. एस. के. मोरे | वाशिम | वाशिम |
| २७ | श्रीम. एस. व्ही. पौनीकर | नागपूर | नागपूर |
| २८ | श्रीम. एस. व्ही. पौनीकर | वर्धा | वर्धा |
| २९ | श्री. ठाकरे | भंडारा | भंडारा |
| ३० | श्री. ठाकरे | चंद्रपूर | चंद्रपूर |
| ३१ | श्रीम. बावनकर | गोंदिया | गोंदिया |
| ३२ | श्री. एस. डी. गणवीर | गडचिरोली | गडचिरोली |



आयुक्त
एकात्मिक बाल विकास सेवा योजना
महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.

जा. क्र. मबावि/एबाविसे /का- २/ ४४१६ /२०१०
आयुक्तालय, महिला व बाल विकास,
महाराष्ट्र राज्य, पुणे (कॅम्प रायगड भवन,सी बी डी बेलापूर ,
नवी मुंबई )
दिनांक :- १७ / ८ / २०१०

प्रति,
सदस्य सचिव,
जिल्हास्तरीय सकस आहार समिती तथा
बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी )-------

विषय - एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत नागरी प्रकल्पातील अंगणवाडयांना पुरक पोषण आहार पुरवठा करण्यासाठी नव्याने महिला मंडळ/महिला संस्था / महिला बचतगटांची नियुक्ती करणेबाबत

संदर्भ - १. शासन निर्णय क्रमांक महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग एबावि २००१/ प्रक्र २७९/ का ५ दिनांक ३०.१२.२०००
२. शासन निर्णय क्रमांक महिला व बाल विकास विभाग एबावि २००४/ प्रक्र २३३/ का ५ दिनांक २८/१०/२००५
३.शा नि क्र एबावि २००८/प्रक्र५९/ का ५/ मुंबई दिनांक २४/८/२००९
४. आयुक्तालयाचे पत्र क्र. क्र एबाविसेयो/का- २ / ४३६२ /२०१० दि. १०/८/२०१०

उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. ४ अन्वये नागरी प्रकल्पातील अंगणवाडयांना गरम ताजा आहार पुरवठा करणेसाठी महिला मंडळे/ महिला संस्था / बचत गट निवड प्रक्रिया करणेबाबतचे परिपत्रक निर्गमित केलेले आहे. सदर परिपत्रकात जिल्हाधिकारी, तथा अध्यक्ष, सकस आहार समिती यांचेकडून **आयुक्तालयामार्फत नियुक्त केलेल्या नोडल ऑफीसर यांनी समितीचे सदस्य सचिव म्हणून काम पहावे व त्यांनी सर्व नागरी प्रकल्पांची निवड प्रक्रिया पुर्ण करावयाची आहे.** असे आदेशीत करण्यात आलेले आहे.

सदर नोडल ऑफीसरच्या यादीमध्ये मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हयांसाठी दोन नोडल ऑफीसरची नियुक्ती करण्यात आलेली आहे. दोन्ही नोडल ऑफीसर यांचेकडे मुंबई शहर व मुंबई उपनगरातील प्रकल्प विभागून दिल्यामुळे दोन जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, सकस आहार समिती यांचेकडे नस्ती सादर करण्यास अडचण निर्माण होऊ शकते. त्यामुळे मुंबई शहर व मुंबई उपनगरातील महिला मंडळ / महिला संस्था / बचत गट निवडीची प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी श्री. जी. व्ही. देवरे, बाविप्रअ धारावी यांनी सदस्य सचिव, सकस आहार समिती मुंबई शहर व मुंबई उपनगराचे कामकाज पहावे. सदर निवड प्रक्रियेसाठी श्री. देवरे यांना सहाय्य करण्यासाठी खालील दोन सहाय्यक नोडल ऑफीसरची नियुक्ती करण्यात येत आहे.

१) श्रीमती. संध्या नगरकर, बाल विकास प्रकल्प अधिकारी, आरे-जोगेश्वरी, मुंबई
२) श्री. अब्दुल चौधरी, बाल विकास प्रकल्प अधिकारी, वडाळा- शिवडी, मुंबई

तसेच श्रीमती बावनकर, बाल विकास प्रकल्प अधिकारी, यांची गोंदिया जिल्हयासाठी नोडल ऑफीसर म्हणून नियुक्ती केलेली आहे. परंतु श्रीमती बावनकर हया गोंदिया प्रकल्पात हजर झालेल्या नसल्यामुळे गोदिया जिल्हयातील नोडल ऑफीसर तथा सदस्य सचिव, सकस आहार समितीचे कामकाज श्री. ठाकरे, बाविप्रअ यांनी पहावे.

आयुक्त
महिला व बाल विकास
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत,माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सादर
१) जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हास्तरीय सकस आहार समिती मुंबई शहर / मुंबई उपनगर / गोंदिया
२) संबधित अधिकारी-

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.